18 AUG 1997

महाराष्ट्र राज्याचे क्रीडा धोरण, १९९६
क्रीडा सप्ताह व मेजर ध्यानचंद जन्मदिवस क्रीडा दिन म्हणून साजरा करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांक : राक्रीधो-१०९६/प्र.क्र. ३३०/क्रीयुसे-१,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ३१ जुलै १९९७

वाचा :—शासन निर्णय क्र. क्रीसप्ता-१०८९/प्र.क्र. ३२३/क्रीयुसे-१, दिनांक ४ नोव्हेंबर १९९१.

**शासन निर्णय :**

महाराष्ट्रातील क्रीडा संस्कृतिची जोपासना व जनतेत क्रीडा वातावरण निर्माण होण्याच्या उद्देशाने राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात दरवर्षी क्रीडा सप्ताह साजरा करण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे. या सप्ताहात क्रीडाविषयक विविध उपक्रम, स्पर्धा, खेळाडूंचा सत्कार, चर्चासत्रे, प्रदर्शने इत्यादी कार्यक्रम आयोजित करण्यात येतात. यासाठी प्रत्येक जिल्ह्यास रु. पाच हजार अनुदान देण्यात येते. एकूण उपक्रमांचा आवाका लक्षात घेता देण्यात येणारे अनुदान अत्यंत अल्प आहे. याशिवाय केंद्र शासनाने मेजर ध्यानचंद यांनी क्रीडा क्षेत्रात केलेल्या कामगिरीचा गौरव म्हणून त्यांचा जन्मदिन (दिनांक २९ ऑगस्ट) राष्ट्रीय क्रीडा दिन म्हणून साजरा करण्याबाबत सर्व राज्यांना निर्देशित केले आहे. त्यामुळे सध्याच्या अनुदानाच्या दरात वाढ करण्यासंबंधिचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. क्रीडा धोरणानुसार क्रीडा सप्ताह व क्रीडा दिन साजरा करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यास रु. दहा हजार अनुदान देण्यास शासन मान्यता देत आहे.

२. संबंधित जिल्हा क्रीडा अधिकारी यांना मंजूरीचे अधिकार प्रदान करण्यात येत असून यासाठी त्यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. यावर होणारा खर्च त्या त्या वर्षाच्या मंजूर अर्थसंकल्पीय तरतूदीतून भागविण्यात यावा. आणि " २२०४-क्रीडा व युवक सेवा १०४-क्रीडा व खेळ (पंचवीस) महाराष्ट्र राज्याच्या प्रत्येक जिल्ह्यात क्रीडा सप्ताह साजरा करणे. २० इतर खर्च योजनेतर (२२०४–११४–८) " या लेखाशिर्षाखाली भागविण्यात यावा.

४. हे आदेश शासन निर्णयाच्या दिनांकापासून पुढील आदेश होईपर्यंत अंमलात राहतील.

हा शासन निर्णय नियोजन विभाग व वित्त विभागाच्या सहमतीने व वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. प्र. क्र. ७३८/व्यय-११, दिनांक २० जुलै १९९७ नुसार निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(रमेशचंद्र कानडे),
सचिव,
महाराष्ट्र शासन.

प्रति,

(१) संचालक, क्रीडा व युवकसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे.
(२) उपसंचालक, क्रीडा व युवकसेवा, मुंबई/पुणे/कोल्हापूर/औरंगाबाद/नागपूर/पुणे
(३) सर्व जिल्हाधिकारी, महाराष्ट्र राज्य.
(४) सर्व जिल्हा क्रीडा अधिकारी, महाराष्ट्र राज्य.
(५) महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई.
(६) महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा व परिक्षण), मुंबई.
(७) महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा व अनुज्ञेयता), नागपूर.
(८) महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा व परिक्षण), नागपूर.
(९) अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
(१०) सर्व जिल्हा कोषाधिकारी, महाराष्ट्र राज्य.
(११) वित्त विभाग, व्यय-११, मंत्रालय, मुंबई.
(१२) शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
(१३) नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
(१४) सर्व विभागीय आयुक्त, महाराष्ट्र राज्य.
(१५) सर्व महापालिका आयुक्त, महाराष्ट्र राज्य
(१६) मा. मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
(१७) मा. राज्यमंत्री (क्रीडा) यांचे स्वाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
(१८) निवड नस्ती (क्रीयुसे-१).